**<u>मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या बुधवार दि. २९ नोव्हेंबर २०१० रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत.</u>**

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची १३३ वी बैठक बुधवार दि.२९ नोव्हेंबर २०१० रोजी दुपारी ३.०० वा. गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृहात संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. सुभाष हजारे,भा.प्र.से. | उप सभापती तथा मुख्य अधिकारी |
| २) | मा. श्री. नंदकुमार काळे | सदस्य |
| ३) | मा.श्री.बशीर पटेल | सदस्य |
| ४) | मा. श्री. किसन बा. जाधव | सदस्य |
| ५) | मा. श्रीमती सुरेखा पाटील | सदस्या |
| ६) | मा.श्री.सईद खान | सदस्य |
| ७) | मा.श्रीमती उल्का पाटकर | सदस्या |
| ८) | मा.श्री.शरद शिरीषकर | सदस्य |
| ९) | मा.श्री.सुबोध बांदिवडेकर | सदस्य |
| १०) | मा.श्री.व्ही.जी.नायर | सदस्य |
| ११) | मा.श्री.हेमराज शाह | सदस्य |
| ११) | मा.श्री.हरिष सणस | सदस्य |
| १३) | श्री.पी.पी.महिषी,<br>*निवासी कार्यकारी अभियंता* | सचिव |
| १४) | श्री.ओ.बी.साहू | सह मुख्य अधिकारी |

सचिव श्री.महिषी यांनी उपस्थित सर्व सन्मा.सदस्यांचे स्वागत करुन मा. सभापती यांच्या परवानगीने बैठकीच्या कामकाजास सुरुवात केली.

**बाब क्रमांक - १३३.१**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची दि.३०/१०/२०१० रोजी झालेल्या १३२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.

मागील बैठकीचे कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र.०१ ते १३ वर सादर करण्यात आले.

बैठकीच्या सुरुवातीस मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी १ नोव्हेंबर, २०१० पासून सारस्वत बँकेमार्फत भाडेवसुलीचे काम सुरु झाले असल्यामुळे मा.मुख्य अधिकारी व अधिकारी-कर्मचा-यांचे अभिनंदन केले. तसेच ॲडव्हान्स भाडे भरल्यास काही रक्कम सुट देता येईल का? असे विचारले असता, मा.मुख्य अधिकारी यांनी बँकेकडे ६ महिन्याचा करार करण्यात आला आहे, बँकेमार्फत होणारी वसुली किती होते ते बघुन त्यानंतर त्या बाबत ठरविता येईल, असे सांगितले. मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी व्हेकेशन नोटीसमध्ये मागील बैठकीत सुधारणा करण्याबाबत सुचविल्यानुसार त्या सुधारणा करण्यात आल्या काय, या बाबत विचारणा केली असता, मा.मुख्य अधिकारी यांनी सूचना व इतर सर्व बाबी विचारात

घेऊन या अनुषंगाने सर्वंकष विचार करुन पुढील कार्यवाही करण्यात येईल असे सांगितले. त्यानंतर सर्व सन्मा.सदस्यांनी धारावी संक्रमण शिबीरातील घुसखोरीबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती देण्यास सांगितले. मा.मुख्य अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे माहिती दिली, "धारावी संक्रमण शिबीराची सप्टेंबर २०१० मध्ये मोहिम स्वरुपात तपासणी व तद्नंतर त्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीअंती एकूण १५१२ सदनिकांपैकी ६ सदनिकांमध्ये घुसखोरी झाल्याचे तर ३३६ सदनिकांमध्ये अनधिकृत रहिवाशांचे असे एकूण ३४२ रहिवाशांचे अनधिकृत वास्तव असल्याचे आढळून आले. या ३४२ सदनिकांपैकी ४५ गाळयांचे विक्रीचे व्यवहार झाल्याचे निदर्शनास आल्याने सदर प्रकरणी धारावी पोलिस स्टेशन येथे फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस तपास सुरु आहे. तसेच ०६ गाळ्यांमध्ये घुसखोरी झाल्याचे, १७० गाळे भाडयाने दिल्याचे व १२१ गाळयांमध्ये अनधिकृत व्यक्तींचे वास्तव्य असल्याचे दिसून आले. चौकशी दरम्यान मंडळाने सिल केलेल्या गाळ्यांपैकी ११० गाळे पात्रता सिध्द झाल्याने संबंधितांस उघडून दिले असून, अद्याप मंडळाचे सिल असलेले १५४ गाळे ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरु आहे. विक्री केलेले, भाडयाने दिलेले, अनधिकृत वास्तव्य असलेल्या गाळयांबाबत मूळ गाळेधारक, दलाल, म्हाडा कर्मचारी व इतर सर्व संबंधितांविरुध्द धारावी पोलिस स्टेशन येथे फौजदारी गुन्हा दाखल केला असून पोलीस तपास सुरु आहे. संक्रमण शिबीरातील अनधिकृत रहिवाशांना म्हाड अधिनियम १९७६ कलम ९५ अ (३) नुसार निष्कासित करण्याची कार्यवाही कार्यकारी अभियंता ग/उ यांचेकडून सुरु करण्यात आलेली आहे. तसेच सदर गैरव्यवहारास जबाबदार असलेल्या अधिकारी/कर्मचा-यांची चौकशी व जबाबदारी निश्चित करण्याची कार्यवाही म्हाडाचे मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी यांचेकडून करण्यात येत आहे."

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी ना हरकत प्रमाणपत्राच्या प्रस्तावामध्ये विकासकांकडून दुरुस्तीवर झालेल्या खर्चापोटी किती रक्कम वसूल करण्यात आली, असे विचारले असता मा.मुख्य अधिकारी यांनी मुख्य लेखा अधिकारी व निवासी कार्यकारी अभियंता यांनी सदर बाबतीत माहिती संकलित करुन सन्मा.सदस्यांना उपलब्ध करुन देण्यात यावी, अशा सूचना दिल्या.

सन्मा.सदस्यांनी असे सूचित केले की,ना हरकत प्रमाणपत्र प्रस्तावाकरीता भाडेकरु/रहिवाशांची यादी संबंधित कार्यकारी अभियंता व उप मुख्य अभियंता यांनी प्रमाणित केल्यानंतर यादीवरील आक्षेपाबाबत पहिले अपिल मा.उपाध्यक्ष/प्रा.यांचेकडे व दुसरे अपिल राज्य शासनाकडे करण्याची तरतूद असल्यामुळे यादी प्रमाणित केल्यानंतर आक्षेपासाठी १ महिन्याच्या कालावधीची वाट पहाण्याची शासन निर्णयात स्पष्ट तरतूद नसल्यामुळे तसे न करता प्रस्तावाची प्रशासकीय छाननी झाल्यानंतर प्रस्ताव मंडळाच्या बैठकीसमोर मान्यतेसाठी सादर करण्यास हरकत नसावी.

सचिव यांनी परिमंडळ-४ यांचे अखत्यारित येत असलेल्या दुरुस्ती प्रस्तावामध्ये मागिल बैठकीत सादर केलेल्या इ.क्र.१७-२३ बोटावाला बिल्डींग, शितलादेवी मंदिर रोड, माहिम ही इमारत दोनदा अनु क्र.६ व १२ वर दर्शविल्याने निव्वळ टप्पयाची रक्कम व अंदाजपत्रकाची रक्कम ही पूर्वी मंजूर झाली. सदर मंजूरीची निव्वळ टप्प्याची रक्कम रु.३,१०,३६,३६३/- ऐवजी रु.२,८६,९०,४५१/- व अंदाजपत्रकाची एकूण रक्कम रु.५,२६,६७,७४३/- ऐवजी रु.४,६०,८१,०३६/- इतकी सुधारणा करण्यात यावी. सदर सुधारणेस सर्व सन्मा.सदस्यांनी मान्यता दिली.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी मंगलवाडी येथील इमारतीकरीता खिडक्यांच्या डिझाईनबाबत विचारणा केली असता, उपमुख्य अभियंता/परिमंडळ-२ यांनी सदर प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवण्यात येईल, असे सांगितले.

सन्मा.सदस्य श्री.नायर यांनी मागच्या बैठकीत त्यांनी जे मुद्दे उपस्थित केले होते ते सर्व मुद्दे कार्यवृत्तांत आले नसल्याचे सांगितले. तसेच सन्मा.सदस्य श्री.शिरिषकर यांनी सुध्दा रिक्त गाळ्यांची मागील बैठकीत चौकशी केली होती, पत्रही दिले होते तरी सुध्दा त्यांना माहिती लेखी स्वरुपात प्राप्त झाली नसल्याचे नमूद केले. यावर सचिव यांनी सांगितले की, सन्मा.सदस्य श्री.नायर यांचे म्हणणे शेवटच्या पानावर म्हणजेच पृष्ठ क्र.१४ वर आले आहे. परंतु, मा.सदस्य श्री.नायर यांनी आपण थोडक्यात लिहिले आहे, मला विस्तृत माहिती खालील मुद्दयांवर हवी आहे.

१. सन- २००७ मध्ये जेव्हा मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळावर सदस्यांची नियुक्ती होवून हे मंडळ अस्तित्वात आले तेव्हापासून मागील बैठकीपर्यंत ना हरकत प्रमाणपत्रास मंजूरी दिली त्या प्रस्तावांमध्ये मंडळास किती अतिरिक्त क्षेत्र उपलब्ध झाले आहे.

२. सन-२००७ साली बृहतसूचीवर किती भाडेकरुंची यादी शिल्लक होती व मागील बैठकीपर्यंत किती शिल्लक आहे आणि मास्टर लिस्टमध्ये किती गाळे वितरीत झाले आहेत.

३. जे गाळे मंडळास प्राप्त झाले त्यामध्ये किती गाळे बृहतसूचीवर वितरीत करण्यात आले व किती गाळे बृहतसूचीव्यतिरिक्त वितरीत करण्यात आले.

४. मंडळाच्या कामामध्ये पारदर्शकता (ट्रान्सफरन्सी) हवी.

मा.मुख्य अधिकारी,दुवपु.यांनी श्री.मठपती, उपमुख्य अधिकारी/पु.गा.यांना सदर बाबतीत उपलब्ध असलेली माहिती देण्याबाबत सूचना दिल्या. तसेच मा.मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, मंडळाचा कारभार हा पूर्णतः पारदर्शक असल्याचे सांगितले. यावर सदस्यांना काही माहिती हवी असेल किंवा काही विशेष मुद्दयावर माहिती हवी त्यांनी विचारावी म्हणजे संबंधित मुद्दावर खुलासा करता येईल.

सन्मा.सदस्य श्री.नायर असे म्हणाले की, मागील बैठकीत मी बृहतसूचीवर किती यादी प्रलंबित आहे याची माहिती विचारली होती. यावर मुख्य अधिकारी यांनी श्री.मठपती, उपमुख्य अधिकारी/पु.गा. यांना या संदर्भात माहिती देण्यास सांगितले. त्या प्रमाणे त्यांनी पुढील प्रमाणे माहिती दिली.

"२००८ मध्ये उच्च न्यायालयात रिट पिटीशन झाले होते त्यामध्ये ९०९ प्रकरण बृहतसूचीसाठी प्रलंबित असल्याचे न्यायालयास कळविले होते. मा.उच्च न्यायालयाने ९०९ प्रकरण ९ महिन्यात निकाली काढण्याचे आदेश दिलेले होते. त्यानंतर ९ महिन्याऐवजी आपण थोडासा वेळ वाढवून घेवून १५/१६ महिन्यामध्ये एका समितीऐवजी ३ समित्या करुन ९०९ प्रकरणांचा निपटारा केलेला आहे. त्या ९०९ प्रकरणांपकी साधारणतः ३१० प्रकरणे पात्र झालेली आहेत. उर्वरित सर्व अपात्र आहेत. ३१० प्रकरणांपैकी १८६ प्रकरणी आपण वितरण पत्र दिलेले आहे. उर्वरित प्रकरणी वैयक्तीक नोटीशीद्वारे कळविण्यात आले असून, तशी वर्तमानपत्रात जाहिरात दिलेली आहे. तथापि त्या भाडेकरु/रहिवाशांचे पत्ते उपलब्ध नसल्याने वितरण किंवा ताबा दिलेला नाही.आजमितीस बृहतसूचीवरील प्रलंबित यादी निरंक आहे."

मा.मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, जी आता सुनावणी चालू आहे ती जानेवारी ते मे २०१० या कालावधीत संक्रमण शिबीरात भरुन घेतलेल्या अर्जांवर आहे. या सुनावणीअंती घेतलेल्या व सुनावणीपूर्वीच्या शिल्लक बृहतसूचीवरील भाडेकरुंना सदनिका वितरण करण्याच्या संदर्भात धोरण आखण्यात येत असून त्यावर विस्तृत बाब टिप्पणी लवकरत मंडळासमोर व प्राधिकरणाच्या विचारार्थ सादर करण्यात येईल.

सन्मा.सदस्य श्री.शिरीषकर व सन्मा.सदस्य श्री.बांदिवडेकर यांनी अशी विचारणा केली की, ज्यांनी संक्रमण शिबीरातील गाळा घेतलेला नाही व अर्जही भरलेला नाही त्यांचेबाबतीत मंडळाने काय निर्णय घेतलेला आहे, त्यावर मा.मुख्य अधिकारी यांनी असे सांगितले की, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या संक्रमण शिबीरामध्ये उपकर प्राप्त इमारतीतील रहिवाशी ज्यांचे वास्तव्य ५ वर्षांपेक्षा जास्त आहे अशा रहिवाश्यांना बृहत्सूची अंतर्गत समाविष्ट करुन प्राधिकरणाच्या धोरणानुसार पुनर्रचित गाळा वितरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.तसेच ज्यांची इमारत काही कारणास्तव होऊ शकत नाही, ज्यांची इमारत रस्ता रुंदीकरणामध्ये गेलेली आहे, ते कुठेही रहात असले तरी त्यांना बृहतसूचीवर घेण्याचे धोरण आहे.

सन्मा.सदस्य श्री.नायर यांनी अशी विचारणा केली की, बृहतसूचीव्यतिरिक्त मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास इतर कोणासही गाळा वितरण करण्याचा अधिकार आहे का, त्यावर मा.मुख्य अधिकारी यांनी असे सांगितले की,मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास बृहतसूचीशिवाय इतरांना गाळा देण्याचा अधिकार नाही.

सन्मा.सदस्य श्री.शिरिषकर यांनी मागिल बैठकीत त्यांनी दिलेल्या पत्रामध्ये आंबेडकर सदन ८२ क्रमांकाचा गाळा हा रिक्त दाखविण्यात आला होता, परंतु तेथे व्यक्ती रहात असल्याचे सांगितले. तसेच रामदूत इमारत गाळा क्र.१३५ श्रीमती जयश्री करपे यांना वितरीत केलेला आहे, तो गाळाही रिक्त दाखविण्यात आला होता. यावर आंबेडकर सदन बाबतीत कोर्टकेस असन्याचे सांगण्यात आले. परंतु सन्मा.सदस्यांना दिलेल्या यादीमध्ये तशी नोंद नसल्याचे निदर्शनास आणून दिले.

सन्मा.सदस्य श्री.सणस यांनी असे सांगितले की, सन्मा.सदस्यांनी दिलेल्या पत्रावर कमित कमी १५ दिवसात संबंधित अधिका-यांनी उत्तर द्यावे, अशी सर्व सदस्यांनी अपेक्षा आहे. त्यावर मुख्य अधिकारी यांनी सर्व विभाग प्रमुखांना/उप मुख्य अभियंता/कार्यकारी अभियंता यांना अशा सूचना दिल्या की,सर्व सन्मा.सदस्यांच्या पत्रांना १५ दिवसात उत्तर देण्यात यावे.

सन्मा.सदस्या श्रीमती सुरेखा पाटील यांनी असे निदर्शनास आणले की, काही ठिकाणी असे आढळून आले आहे की, भाडेकरु/रहिवाशांनी संक्रमण शिबीराचे गाळे खाली न करता पुनर्रचित इमारतीत ताबा घेतला आहे. गणेशप्रभा या इमारतीत असे झाले असल्याचे त्यांनी सांगितले.

सन्मा.सदस्या श्रीमती सुरेखा पाटील यांनी मागाठाणे बस डेपोजवळील इ.क्र.१ मधील गाळा क्र.२ विकला असल्याचे सांगितले. त्यावर प्रकरण तपासून संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याच्या सूचना संबंधित कार्यकारी अभियंता यांना मा.मुख्य अधिकारी यांनी सूचना दिल्या. तसेच मुख्य अधिकारी,दुवपु.यांनी रिक्त गाळयांची वेळोवेळी अचानक तपासणी संबंधित कार्यकारी अभियंता यांना करावयाच्या सूचना दिल्या.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी श्री.शंकर पार्टे यांच्या प्रकरणी लवकरात लवकर निर्णय घेण्यास सांगितले. यावर मुख्य अधिकारी यांनी श्री.मठपती, उपमुख्य अधिकारी (पु.गा.) यांनी प्रकरणी गुणवत्तेवर निर्णय घेण्याच्या सूचना दिल्या.

सन्मा.सदस्य श्री.हेमराज शहा यांनी ग्रॅण्टरोड येथील इमारत कोसळून ५ जण जखमी झाले हे सदस्यांना वर्तमानपत्रातून समजते. परंतु नियंत्रण कक्षामधून कळविण्यात आलेले नाही. मंडळाच्या बैठकीत ठरल्यानुसार सन्मा.सदस्यांना कळविणे आवश्यक असल्याने का कळविले नाही.यावर श्रीमती शेंडे, उपमुख्य अभियंता/परिमंडळ-2 यांनी सांगितले की, उल्लेखित अपघातात 5 व्यक्ती जखमी झालेल्या नसून 1 व्यक्ती किरकोळ जखमी झाली असल्याने सदर प्रकरण किरकोळ स्वरुपाचे असल्याने सन्मा.सदस्यांना कळविण्यात आले नव्हते. मात्र सन्मा.सदस्यांच्या भावना लक्षातघेवून यापुढे सर्व अपघात/दुर्घटनेची माहिती तात्काळ सर्व सन्मा.सदस्यांना दिली जाईल.

सन्मा.सदस्य श्री.नायर यांनी कोणाही सदस्यांनी पत्र दिले तर त्याचे उत्तर कृपया देण्यात यावे. जर सदस्यांच्या पत्रांना उत्तर मिळत नसेल तर आम जनतेस न्याय कसा मिळणार, असे नमूद केले. यावर मा.मुख्य अधिकारी यांनी सूचना केली की, कार्यकारी अभियंता, उपमुख्य अभियंता, उपमुख्य अधिकारी, सहमुख्य अधिकारी यांनी याची नोंद घ्यावी व सन्मा.सदस्यांना त्यांचे पत्राचे अनुषंगाने 15 दिवसात उत्तर पाठविण्यात यावे.

वरील सविस्तर चर्चेअंती मा.सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या इतिवृत्तात नोंद घेवून कार्यवृत्तांत स्थायी करण्यात आले.

**बाब क्रमांक - १३३.२**

विषय - अनुपालन अहवाल
इ.क्र.१६-२६, डिलीमा स्ट्रीट, ३०१-३०९ रे रोड माझगाव, निविदा स्विकृतीबाबत.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.१५ ते १९ वर सादर करण्यात आलेला आहे.

सदर बाबतीत निम्नतम निविदा १४.९८ % (अधिक) स्विकृतीसाठी बाब टिप्पणी मागिल बैठकीत ठेवण्यात आली होती. परंतु सन्मा.सदस्यांनी इमारतीची पहाणी करावयाची असल्याने प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवण्याबाबत मान्यता दिली होती. त्यानुसार सन्मा.सदस्यांनी स्थळ निरिक्षण केले असून, स्थळ निरिक्षणाबाबत सदर अनुपालन अहवाल या बैठकीत ठेवलेला आहे.

सविस्तर चर्चेअंती उपरोक्त इमारतीच्या निम्नतम निविदा स्विकारण्याच्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३३/११३८**

इ.क्र.१६-२६, डिलीमा स्ट्रीट, ३०१-३०९ रे रोड माझगाव, या इमारतीच्या दुरुस्ती कामाच्या

१. अंदाजपत्रकीय रक्कम रु.८६,५१,१८२/-

२. निविदेची टक्केवारी १४.९८%(अधिक)

३. निविदा रक्कम रु.९९,४७,१२९/-

४. निम्नस्तर निविदा देकार देणा-या कंत्राटदाराचे नाव - राज कंन्स्ट्रक्शन

इमारतीच्या निम्नतम निविदा स्विकृतीच्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता दिली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

**बाब क्रमांक - १३३.३ (१)**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-३ मधील प्रस्तावित दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदापत्रकांना प्रशासकिय मान्यता देण्याबाबत.
परिमंडळ-३ मधील (ई-१,ई-२,फ-दक्षिण) ३ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. २१ ते २९ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३१/११३९**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण ०३ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.७९,२८,५६४/- (रुपये एकोणऐंशी लक्ष,अठ्ठावीस हजार,पाचशे चौसष्ट फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.५३,६०,४२०/- (रुपये त्रेपन्न लक्ष,साठ हजार, चारशे वीस फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

**बाब क्रमांक - १३३.३ (२)**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-३ मधील प्रस्तावित दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदापत्रकांना प्रशासकिय मान्यता देण्याबाबत.
परिमंडळ-२ मधील (डी-१,डी-२,डी-३) १४ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ३१ ते ३९ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३३/११४०**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण १४ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.४,०४,३६,६०२/- (रुपये चार कोटी, चार लक्ष,छत्तीस हजार,सहाशे दोन फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.२,५४,०६,३००/- (रुपये दोन कोटी, चोपन्न लक्ष,सहा

हजार, तिनशे फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

मूळ कार्यसूचीवरील विषय संपल्यानंतर आयत्यावेळचे विषय मंडळासमोर मांडण्यासाठी सचिवांनी मा.सभापती यांची परवानगी मागितली. परवागनी दिल्यानंतर विषय मंडळाच्या बैठकीत ठेवण्यात आले.

<u>आयत्यावेळेचे विषय</u>

**बाब क्रमांक - १३३.३ (३)**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-१ मधील प्रस्तावित दुरुस्ती *कामांच्या मुळ व सुधारित अंदापत्रकांना प्रशासकिय मान्यता देण्याबाबत.* परिमंडळ-१ मधील (अ,ब,सी-१,सी-२,सी-३ विभाग) ०५ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ४१ ते ५१ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.
सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३३/११४१**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण ०५ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.९३,८५,६३५/- (रुपये त्र्याण्णव लक्ष,पंच्याऐंशी हजार,सहाशे पस्तीस फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.५०,९९,१७४/- (रुपये पन्नास लक्ष,नव्याण्णव हजार, एकशे चौ-याहत्तर फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

**बाब क्रमांक - १३३.३ (४)**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-४ मधील प्रस्तावित दुरुस्ती *कामांच्या मुळ व सुधारित अंदापत्रकांना प्रशासकिय मान्यता देण्याबाबत.* परिमंडळ-४ मधील (ई-१,ई-२,फ-दक्षिण विभाग) ०१ इमारत.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ५३ ते ५७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.
सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३३/११४२**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण ०१ उपकरपात्र इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.३४,३२,०००/- (रुपये चौतीस लक्ष,बत्तीस हजार फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.१४,१०,१४२/- (रुपये चौदा लक्ष,दहा हजार, एकशे बेचाळीस फक्त) इतक्या

रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

**बाब क्रमांक - १३३.४**

विषय - शुध्दीपत्रक
१. इ.क्र.१४६-ए-१४८ फॉकलंड रोड

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ५९ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.
सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३३/११४३**

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या दि.१७/०८/२०१० रोजी झालेल्या १३० व्या बैठकीत इ.क्र.१४६-ए-१४८, फॉकलंड रोड या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीचे पाचव्या टप्प्याच्या सुधारित अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात आली होती. सदर टप्पा हा पाचवा टप्पा नसून चौथा टप्पा असल्याबाबत उपमुख्य अभियंता/परिमंडळ-२ यांनी त्यांचे पत्र क्र.२८२७, दि.१२.११.२०१० अन्वये कळविले असून, सदर शुध्दीपत्रकास मंजूरी देण्यात आली.

**बाब क्रमांक - १३३.४**

विषय - शुध्दीपत्रक
२. इ.क्र.१३२-सी *भगतवाडी*

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ६१ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.
सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३३/११४४**

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या दि.३०/१०/२०१० रोजी झालेल्या १३२ व्या बैठकीत इ.क्र.१३२-सी भगतवाडी या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीचे अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात आली होती. मात्र इ.क्र.१३२-सी भगतवाडी प्रशासकीय मान्यतेची रक्कम रु.१६,०४,३७९/- ऐवजी रु.२२,५४,६५०/- अशी वाचावी त्याप्रमाणे परिमंडळ-१ मधील एकूण ४५ इमारतींच्या दुरुस्ती प्रस्तावाची प्रशासकीय मान्यतेची रक्कम रु.८८,६६,५२,६५१/- ऐवजी रु.८,७३,०२,९२२/- अशी वाचावी. सदर शुध्दीपत्रकास मंजूरी देण्यात आली.

**बाब क्रमांक - १३३.५**

विषय - परिमंडळ-१ मधील अ,ब,सी-१,सी-२ व सी-३ विभागातील मोडकळीस आलेल्या *इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या व अतिधोकादायक भाग* पाडण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास सुधारित प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याबाबत.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.६३ वर सादर करण्यात आला.

सदर प्रस्तावांवर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३३/११४५**

परिमंडळ-१ मधील अ,ब,सी-१,सी-२ व सी-३ विभागातील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या व अतिधोकादायक भाग पाडण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास दि.१/४/२०१० ते दि.३१/३/२०११ पर्यंतच्या कालावधीकरीता खालीलप्रमाणे सुधारित प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली.

| अ.क्र. | विभाग | टेकू लावण्याच्या कामासाठी मंजूर प्रशासकीय मान्यतेची रक्कम. | टेकू लावण्याच्या व धोकादायक भाग पाडण्याच्या कामासाठी प्रस्तावित सुधारित प्रशासकीय मान्यतेची रक्कम. |
|---|---|---|---|
| १ | अ | रु.६,९७,३०४/- | रु.३५,००,०००/- |
| २ | ब | रु.२३,६६,२५१/- | रु.६७,००,०००/- |
| ३ | सी-१ | रु.१२,२७,९३२/- | रु.४०,००,०००/- |
| ४ | सी-२ | रु.७,०३,१४०/- | रु.१,००,००,०००/- |
| ५ | सी-३ | रु.८,९४,६७०/- | रु.८०,००,०००/- |
| | एकूण | रु.५८,८४,२९७/- | रु.३,२२,००,०००/- |

**बाब क्रमांक - १३३.६**

विषय - इमारत क्र.६,ओलीवर रोड, मुंबई या इमारतीच्या ना हरकत प्रमाणपत्र (परताव्यासह) संरचनात्मक दुरुस्तीबाबत.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ६५ ते ६७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३३/११४६**

इमारत क्र.६,ओलीवर रोड,मुंबई या इमारतीच्या पहिल्या टप्प्यातील ना हरकत प्रमाणपत्र (परताव्यासह) संरचनात्मक दुरुस्तीस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली.

**बाब क्रमांक - १३३.७**

विषय - परिमंडळ-१ मधील दुरुस्ती कामाला प्रशासकीय मान्यतेवरील रक्कमेस मंजूरी मिळण्याबाबत. (इ.क्र.२०१-२०३ पी डिमेलो रोड)

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ६९ ते ७३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३३/११४७**

परिमंडळ-१ मधील इ.क्र.२०१-२०३, पी.डिमेलो रोड, मुंबई या इमारतीच्या चौथ्या (सुधारित) दुरुस्ती क्कामासाठी दि.१७/०२/२००९ रोजी मंडळाच्या ११५ व्या बैठकीत प्रशासकीय मान्यता रु.२५,३६,६६०/- मंजूरी प्रदान करण्यात आली होती. सदर इमारतीचे काम पूर्ण झाले असून सदर इमारतीस मंजूर प्रशासकीय मान्यतेपेक्षा अधिक काम असल्याने व येणारा खर्च प्रचलित प्रमाणित मर्यादेच्या आत येत असल्याने प्रशासकीय मंजूरीवरील वाढीव रक्कम रु.८४,७९१/- या जादा रकमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली.

**बाब क्रमांक - १३३.८**

विषय - पुनर्विकास
*मुंबई बेटावरील अ वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाकरीता*
ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचे प्रस्ताव.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.७९ ते ८१ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले होते. सन्मा.सदस्य श्री.हरिष सणस यांनी ना हरकत प्रमाणपत्र देण्याचे महत्वाचे प्रस्ताव आयत्यावेळच्या विषयामध्ये घेण्यात येवू नयेत असे सूचित केले. त्यास सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी अनुमोदन दिले. परंतु सन्मा.सदस्य श्री.बशीर पटेल यांनी मंडळाच्या या पूर्वी झालेल्या बैठकीत ना हरकत प्रमाणपत्राचे प्रस्ताव आयत्यावेळच्या विषयात घेण्यात आले असल्याने तसेच मागिल २ बैठकीत प्रस्ताव घेण्यात आलेले नाहीत. तरी, कार्यकारी अभियंता, उपमुख्य अभियंता या सारख्या अधिका-यांनी तपासणी करुन सादर केलेल्या प्रस्तावावर अविश्वास दाखविल्यासारखे होईल व यामुळे चुकीचा संदेश जाईल. अगोदरच मंडळाकडे कर्मचारी वर्ग अपुरा आहे. त्यामुळे आयत्यावेळी ठेवलेल्या विषयांचे प्रस्ताव विचारात घेण्यात यावेत. यावर सन्मा.सदस्य श्रीमती सुरेखा पाटील, श्रीमती उल्का पाटकर, श्री.शरद शिरिषकर, श्री.सुबोध बांदिवडेकर, श्री.व्ही.जी.नायर यांनी ना हरकत प्रमाणपत्राचे प्रस्ताव आयत्यावेळच्या विषयामध्ये समाविष्ट करण्यास विरोध दर्शविला. आयत्यावेळच्या विषयामध्ये सदर विषय घेतल्याने सन्मा.सदस्यांना त्या विषयावर अभ्यास किंवा सखोल विचार करण्यास वेळ मिळत नसल्याने कृपया यापुढे आयत्यावेळी ना हरकत प्रमाणपत्राचे प्रस्ताव ठेवण्यात येवू नये. तसेच बैठकीचे कार्यवृत्त किमान ४ दिवस अगोदर मिळेल याची काळजी घेण्याबाबत निवासी कार्यकारी अभियंता यांना सांगितले. तसेच सर्व सन्मा.सदस्यांनी ना हरकत प्रमाणपत्राचे प्रस्ताव या बैठकीत आयत्यावेळच्या विषयात न घेता पुढील बैठकीत मान्यतेसाठी ठेवण्याचा निर्णय घेतला.

सन्मा.सदस्य श्री.हरिष सणस यांनी बृहतसूचीच्या सुनावणीबाबत माहिती देण्यास विनंती केली. त्यानुसार मा.मुख्य अधिकारी यांनी विस्तृत माहिती सभागृहास दिली व बृहतसूचीची सुनावणी फेब्रुवारी महिन्यानंतर संपुष्टात आल्यावर घुसखोरांना निष्कासीत करण्याची कार्यवाही संबंधित कार्यकारी अभियंता यांचेकडून करण्यात येईल असे सांगितले.

सन्मा.सदस्य श्री.हेमराज शहा यांनी १८-२० जेल रोड या इमारतीच्या दुरुस्तीबाबत विचारणा केली असता कार्यकारी अभियंता ब विभाग यांनी सदर इमारतीमध्ये प्रमाणित मर्यादेपेक्षा साधारणतः रु.१५

लक्ष अतिरिक्त रक्कम लागणार असून, ती रक्कम रहिवाशी/भाडेकरुंना कळविण्यात आल्याचे व रहिवाशी/ भाडेकरु यांनी सदर रक्कम आमदार निधीतून उपलब्ध होणार असून, उर्वरित रक्कम लवकरच जमा होण्याची शक्यता आहे. त्यानंतर इमारतीचे काम ६ महिन्याचे आत पूर्ण करण्यात येईल.

सन्मा.सदस्य श्री.हरिष सणस यांनी मिल लॅन्डवर बांधण्यात येत असलेल्या संक्रमण व पुनर्वसन सदनिकांबाबत माहिती विचारलीअसता, मा.मुख्य अधिकारी यांनी सभागृहास विस्तृत माहिती दिली.

बैठकीच्या अखेरीस मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी यांनी सर्वांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहिर केले.

सचिव तथा निवासी कार्यकारी अभियंता,
मुं.इ.दु.व पु.मंडळ

मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी,
मुं.इ.दु.व पु.मंडळ